नालेसफाईच्या कामचुकार ठेकेदारांवर कारवाई! ५४.६८ लाख रुपयांचा दंड वसूल

■ मुंबई

महानगरपालिके कडून पावसाळ्यापूर्वी नालेसफाईचे काम हाती घेण्यात आले. ठेकेदारांना कामे दिल्यावरही कामात कुचराई केली जात असल्याचे दिसून आल्यानंतर पालिकेने काही ठेकेदारांना दंड ठोठावला आहे. कामचुकार ठेकेदारांकडून ५४.६८ लाख रुपये दंड वसूल करण्यात आला. पालिकेने पावसाळ्यात पाण्याचा जलदगतीने निचरा होण्यासाठी नाल्यातील गाळ काढण्याची मोहीम हाती घेतली. त्याबाबत नालेसफाईचे कंत्राट विविध ठेकेदारांना देण्यात आले. १० लाख २१ हजार मेट्रीक टन गाळ काढण्याचे उद्दिष्ट पालिकेने निश्चित केले. ठेकेदारांनी घेतलेल्या नालेसफाईच्या कामात कुचराई केल्याचे पालिका प्रशासनाला आढळून आले. इर्ला नाला यामडावाडी नाल्यातून गाळ काढणार्या ठेकेदारांनी कामांत कुचराई केल्याने अडीच लाखांचा दंड ठोठावण्यात आला. पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी सदर कामांची पाहणी केली असता अनेक नालेसफाई कामात निष्काळजीपणा होत असल्याचे आढळून आले. ठेकेदारांनी नाल्यातील गाळ काढून नाल्याच्या कडेला व रस्त्यांवर टाकला. त्यामुळे पादचार्यांनाही अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे.

राजकोट जळीत कांडातील आरोपीचाही आगीत मृत्यू

■ अहमदाबाद

राजकोट येथील टीआरपी गेम झोन मध्ये लागलेल्या आगीत २८ जणांचा मृत्यू झाला होता. तर या गेम झोनचा मालक फरार असल्याचे सांगितले जात होते. पण आज मात्र वेगळीच माहिती पुढे आली आहे. या अग्निकांडात गेम झोनचा मालक प्रकाश हिरण याचाही जळून मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. कारण आग लागली तेव्हा प्रकाश आतमध्येच होता असे तपासात उघडकीस आले आहे. राजकोटच्या टीआरपी प्ले झोनला लागलेल्या आगीत २८ जणांचा मृत्यू झाल्यानंतर या प्ले झोनचा मालक असलेल्या प्रकाश हिरनचा पोलीस शोध घेत होते. याच दरम्यान सुरू असलेल्या चौकशीत आग लागली तेव्हा प्रकाश आतच होता अशी माहिती त्याच्या भावाने पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी अग्निकांदातील सापडलेल्या मृतदेहांच्या अवशेषांचा डीएनए घेतला आणि तो प्रकाशच्या आईच्या डीएनएशी मॅच करून पहिला असता एका मृतदेहाच्या अवशेषांशी तो मॅच झाला. त्यामुळे प्रकाश हिरण याचाही या अग्निकांडात मृत्यू झाल्याच्या निष्कर्षापर्यंत पोलीस पोहचले आणि आज त्यांनी ही माहिती जाहीर केली.

राममंदिर येथील एमएमआरडीएच्या इमारती मरणासन्न अवस्थेत

■ मुंबई

राम मंदिर स्थानक (पश्चिम) अजित ग्लास वर्क्स रोड येथील एमएमआरडीएच्या अंदाजे सात इमारती मरणासन्न अवस्थेत उभ्या आहेत. संबंधित

रहिवाशांचा जीव टांगणीला

विभागाकडून या इमारतींची दुरूस्ती करण्यात येत नसल्याने यामध्ये राहाणार्या रहिवाशांचा जीव टांगणीला लागला आहे.

एमएमआरडीएने उपनगरातील प्रकल्पग्रस्त बाधितांसाठी पी १ ते पी-१० अशा सात इमारती बारा वर्षांपूर्वी बांधल्या आहेत. मात्र इमारतींच्या बांधकामाने कमी कालावधीत मान टाकली आहे. त्यामुळे या इमारतींची दुरूस्ती केली जावी, अशी मागणी स्थानिकांकडून वारंवार केली जात आहे. पण इमारती दुर्लक्षित राहिल्याने स्थानिकांत चिंतेचे वातावरण आहे. याप्रकरणी एमएमआरडीए कार्यालयातील एका अधिकार्याकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले, यामध्ये राहाणार्या कुटुंबियांना इतरत्र पर्यायी व्यवस्था करून या इमारती रिकामी करण्यात येणार आहेत. म्हणून इमारतींची दुरूस्ती केली जात नाही. पर्यायी जागा मिळविण्याच्या प्रयत्नात आम्ही गेले दोन वर्ष आहोत. जागा मिळताच खोल्या रिक्त केल्या जातील.

मिझोराममध्ये दगडाची खाण खचल्याने सात जणांचा मृत्यू! अनेक जण बेपत्ता

■ आयझोल

मिझोराममधील आयझोलच्या दक्षिणेकडील भागातील एक दगडाची खाण खचल्याने झालेल्या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण बेपत्ता झाल्याची माहिती मिझोरामच्या पोलिस अधिकार्यांनी दिली आहे.

मिझोराममध्ये कालपासून जोरदार पाऊस सुरु असल्याने अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत. त्यातच ही दगडाची खाण खचल्याने खाणीत काम करत असणार्या ७ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण बेपत्ता झाले आहेत. या खाणीच्या ठिकाणी बचाव दलाचे पथक बचाव कार्य करत आहेत. पावसामुळे नद्यांच्या पातळीत वाढ झाल्यामुळे ही खाण खचल्याचे म्हटले जात आहे. मिझोराममध्ये नदी किनारी राहणार्या लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे सर्व शाळा

व महाविद्यालये पुढील काही दिवस बंद करण्यात आली आहेत. प्रशासनाने राज्य सरकारच्या कर्मचार्यांव्यतिरिक्त इतर खासगी कर्मचार्यांना घरीच राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

नाशकात माजी नगरसेविकेच्या पतीसह चौघांवर हल्ला

■ नाशिक

पार्टीचा आवाज कमी करण्याचा राग

नाशिक शहरातील नाशिकरोड परिसरात शिंदे गटाच्या माजी नगरसेविका जयश्री खर्जुल यांच्या पतीसह आणखी चौघांवर काल रात्री उशिरा तरुणांनी हल्ला केला. या हल्ल्यात जयश्री खर्जुल यांचे पती नितीन खर्जुल गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. वाढदिवसाच्या कार्यक्रमातील गोंधळ कमी करायला सांगितल्याने तरुणांना राग आला आणि त्यामुळे त्यांनी नितीन खर्जुल यांच्यावर हल्ला केला.

नाशिकरोड परिसरात काल रात्री काही तरुण वाढदिवस साजरा करत होते. वाढदिवस साजरा करताना गोंधळ करू नका आणि पार्टीचा आवाज कमी करा, असे नितीन खर्जुल यांनी तरूणांना सांगितले. या गोष्टीचा राग मनात ठेवत तरुणांनी नितीन खर्जुल यांच्यावर हल्ला केला. यावेळी तेथील उपस्थित काही लोक खर्जुल यांना सोडविण्यासाठी गेली असता तरुणांनी त्यांना देखील मारहाण केली. या हल्ल्यात नितीन खर्जुल यांच्यासह चौघेजण जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिसांत तक्रार करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

सातारच्या वाई नगरपालिकेचे १० कोटींचे अनुदान रोखले!

■ कराड

सातारा जिल्ह्यातील वाई नगरपालिकेचे १० कोटी रुपयांचे अनुदान शासनाने रोखले आहे.शासन मंजुरी मिळालेल्या योजनांची लोकवर्गणी पालिकेने भरली नसल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र याचा गंभीर परिणाम पालिकेच्या दैनंदिन कामकाज आणि शहर विकासकामांवर होत आहे. वाई पालिकेला पाणीपुरवठा योजनेसाठी

५६ कोटी, भुयारी गटार योजना २३ कोटी व अन्य विकासकामांसाठी २१ कोटी रुपये असे मिळून १०० कोटी रुपये खर्च असलेल्या योजना शासनाने मंजूर केल्या आहेत.मात्र या योजनांची ८ लाख रुपये लोकवर्गणी पालिकेकडे निधी उपलब्ध नसल्याने भरलेली नाही.त्यामुळे १५ वा वित्त आयोग व घनकचरा व्यवस्थापनासाठी आणि इतर अनुदाने मिळून १० कोटींचा अनुदान निधी शासनाने रोखला आहे.आता याबाबत शासनाशी पत्रव्यवहार आणि सचिव पातळीवर प्रत्यक्ष चर्चा सुरू असून लवकरच त्यावर तोडगा निघेल,अशी आशा पालिकेच्या मुख्याधिकारी संजीवनी दळवी यांनी व्यक्त केली आहे.

नक्षलींकडून धमक्यांमुळे वैद्यराज हेमचंद मांझी पद्मश्री परत करणार

■ रायपूर

नक्षलींकडून वारंवार मिळत असलेल्या धमक्यांमुळे आयुर्वेदिक औषधे देणारे वैद्यराज हेमचंद मांझी यांनी आपला पद्मश्री पुरस्कार परत करणार

असल्याचे म्हटले आहे. त्याप्रमाणे आपले औषध देण्याचे काम आजपासून पूर्णपणे थांबवण्याची घोषणाही त्यांनी केली आहे. छत्तीसगड मध्ये हेमचंद मांझी हे आयुर्वेदिक औषधांच्या माध्यमातून रुग्णसेवा करत असतात. त्यांच्या या कामामुळे त्यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. मात्र ते आमदाई लोखंडाच्या खाणीचे दलाल असल्याचा आरोप नक्षली दलांनी केला.

छत्तीसगड च्या चमेली गावात नक्षलवाद्यांनी बीएसएनलच्या एका टॉवरला आग लावली. त्यानंतर त्यांनी चमेलीमध्ये हेमचंद माझी हे खाण उद्योजकांचे दलाल असून त्यांना देशातून बाहेर काढले पाहिजे असे पोस्टर लावले. त्यानंतर वैद्यराज यांनी हा निर्णय घेतला असून प्रशासनाकडे घराची व सुरक्षेची मागणी केली आहे. सध्या ते छोटेडोंगर या आपल्या मुळ गावी असून त्यांनी औषध देण्याचे थांबवले आहे.

जागावाटपाची चर्चा चॅनेलच्या माध्यमातून होत नाही

■ नागपूर

मुनगंटीवारांची भुजबळांवर

जागा वाटपासंदर्भातील चर्चा किंवा जागा वाटपाची मागणी चॅनेलच्या माध्यमातून कधीही होत नाही, अशी टीका भाजपा नेते सुधीर मुनगंटीवार यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांच्यावर केली आहे. आपण महायुतीत आलो तेव्हा विधानसभेच्या निवडणुकीत आम्हाला ८० ते ९० जागा देण्याचा शब्द देण्यात आला आहे. लोकसभेला जी खटपट झाली तशी पुढे होता कामा नये. आम्हाला विधानसभेत ८० ते ९० जागा मिळाल्या पाहिजे. आता यापुढे महायुतीत आपल्याला योग्य तो वाटा मिळाला पाहिजे, असे वक्तव्य छगन भुजबळ यांनी केले होते. त्यांच्या या वक्तव्याला आता सुधीर मुनगंटीवार यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, जागावाटपाची मागणी किंवा विधानसभेच्या जागावाटपासंदर्भातील चर्चा ही चॅनेलच्या माध्यमातून कधीही होत नाही. यातून काही कारण नसताना अडचणी आणि समस्या निर्माण होतात. विधानसभेच्या जागावाटपासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे काही मत असेल किंवा इतर नेत्यांचे काही मत असेल त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, जे पी नड्डा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली पाहिजे. चॅनलच्या माध्यमातून आम्हाला इतक्या जागा हव्यात, असे म्हणणे गैर आहे. यामध्ये तुम्हाला कोणी आश्वस्थ केले, याचा कोणताही पुरावा नसतो, तरीही सांगायचे असेल तर स्पष्टपणे सांगितले पाहिजे.

आम्हाला एवढ्या जागा देण्यासंदर्भात या नेत्यांनी शब्द दिला होता. पण अशा प्रकारचे धुके निर्माण करण्यात काहीही अर्थ नाही. यावर भुजबळांनी प्रत्युत्तर देत म्हटले की भाजपा मोठा भाऊ आहे त्याला जास्त जागा मिळणार हे मान्य आहे आणि मी जे बोललो ते बाहेर बोललो नाही तर पक्षाच्या बैठकीत मी माझे मत मांडले होते .

कर्नाटकचे मंदिर युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत

■ म्हैवूर

युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ २०२३ च्या यादीत कर्नाटकातील होयसाळेश्वर मंदिराचा समावेश झाला आहे. हे मंदिर कर्नाटकच्या हसन जिल्ह्यात म्हैसूर विमानतळापासून अंदाजे १५० किमी अंतरावर आहे.

होयसाळेश्वर मंदिर उंच चबुतर्यावर बांधलेले असून या चबुतर्यावर १२ कोरीव थर आहेत.होयसाळ वास्तुकलेचा हा उत्तम नमुना आहे.कारण या १२ थरांना जोडण्यासाठी चुना,सिमेंट किंवा इतर कोणतीही सामग्री वापरलेली नाही. येथील कोरीवकाम एखाद्या मशिनच्या मदतीने देखील होणार नाही इतके थक्क करणारे आहे. या मंदिराची निर्मिती ११२१ मध्ये करण्यात आली आहे.

सोयाबीन पेरणीत १० टक्के वाढ कृषी विभागाचा अंदाज

■ छत्रपती संभाजीनगर

भारतीय हवामान विभागाने २०२४- २५ या वर्षाच्या पर्जन्यमानाचा अनुकूल अंदाज दिला आहे. त्यामुळे जिल्ह्यात खरिपाच्या पेरणीत सोयाबीनमध्ये दहा टक्के वाढ होण्याचा अंदाज कृषी विभागाने प्रस्तावित केला आहे. सोयाबीनचे पीक घेणार्या सर्व शेतकर्यांना वेळेवर व संशोधित बियाणे पुरवण्याची हमी महाबीजने घेतली आहे.

गेल्या वर्षी जिल्ह्यात २९, २७२ हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी झाली होती. यंदा शेतकर्यांचा कल पाहून यावर्षीच्या खरीप हंगामात ३३ हजार ९०० हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी प्रस्तावित करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र १०.०७ लाख हेक्टर आहे. त्यापैकी ८.१४ लाख हेक्टर क्षेत्र लागवडी खालील आहे. खरिपासाठी ६.५७ लाख हेक्टर क्षेत्र हे पेरणी लायक आहे. शेतकर्यांसाठी कपाशी महत्त्वाचे पीक असल्याने खरिपाच्या एकूण प्रस्तावित सरासरी ६० टक्के क्षेत्रावर कपाशीची लागवड होणार आहे.

भाजपा नेत्याच्या कारने पिता-पुत्राला उडवले

■ छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यात भीषण अपघाताची घटना घडली. भाजपाचे जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील शिंदे यांच्या कारने दुचाकीवरून जात असलेल्या पिता-पुत्रांना जोरदार धडक दिली. या धडकेत दोघेही गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. इसाक शेख आणि अन्वर शेख, अशी जखमी पिता-पुत्रांची नावे आहेत. जखमी पिता-पुत्र पैठण तालुक्यातील तारु पिंपळवाडी गावातील रहिवासी असून ते काल लग्नासाठी बाहेरगावी निघाले होते.

ढाकेफळ रस्त्यावरील वडगाव शिवारात त्यांची दुचाकी आली असता, भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता, की पिता-पुत्र रस्त्याच्या कडेला जाऊन कोसळले. अपघातानंतर कारचे समोरील दोन्ही टायर फुटले. घटनेनंतर कारचालकाने घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, स्थानिकांनी त्याला पकडून चोप दिला. यानंतर ग्रामस्थांनी अपघाताची माहिती पोलिसांना दिला. जखमी अवस्थेत असलेल्या पिता-पुत्रांना उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी गुन्हा नोंदवला आहे.



जळगावात पारा वाढला! ८ दिवसांत सोळा बेवारस व्यक्तींचा मृत्यू

■ जळगाव

गेल्या आठ दिवसांपासून उष्णतेचा पारा वाढल्याने जळगांव शहरात १६ बेवारसांचा मृत्यू झाल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या मृतदेहांवर सामूहिक अंत्यसंस्कार करण्यात आले.

आठ दिवसांत सोळा बेवारस मृतदेह आढळल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. महापालिका व पोलीस प्रशासनाने मृतदेह ताब्यात घेऊन जिल्हा रुग्णालयाच्या शवागारात ठेवले . वैद्यकीय अधिकार्यांनी या सर्व मृतदेहाची तपासणी केली असता काही जणांचा उष्माघाताने तर काहींचा विविध आजाराने मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे. मंत्री गिरीश महाजन यांच्या जीएम फाऊंडेशनने महापलिका व आरोग्य यंत्रणेकडे पाठपुरावा करून या सर्व सोळा मृतदेहांवर अंत्यसंस्कार केले. मृत्यू झालेल्यांची ओळख पटलेली नसल्याने अडचणी येत होत्या.

अकोल्यात बियाण्यांसाठी शेतकर्यांचा रास्तारोको

■ अकोला

पावसाळा तोंडावर आल्याने बियाणी खरेदी करण्यासाठी शेतकर्यांची लगबग सुरू आहे. मात्र पसंतीचे बियाणे कृषी केंद्र संचालक देत नसल्याने शेतकर्यांमध्ये चांगलाच रोष निर्माण झाला आहे. कृषी केंद्र चालकांनी आपली दुकानेच बंद ठेवल्याने संतापलेल्या शेतकर्यांनी अकोल्यातील टिळक रोडवर रास्ता रोको आंदोलन केले. शेतकर्यांनी खरीप हंगामासाठी आपली शेती पेरणीसाठी तयार करून ठेवली. शासनाकडून बियाण्यांचे भावसुद्धा ठरवून देण्यात आले आहेत.

शेतकर्यांना लागणारे पसंतीचे बियाणे कृषी केंद्र चालक देत नाही. पसंतीचे बियाणे लागल्यास ८५० रुपयांच्या बॅगसाठी तब्बल १ हजार ५०० रुपये शेतकर्यांना मोजावे लागत आहेत. मंगळवारी अकोला येथे शेतकरी बियाणे घेण्यासाठी आले असता संपूर्ण कृषी केंद्रच बंद असल्याचे पाहून शेतकरी चांगलेच संतापले आहेत. शेतकर्यांनी पहाटेपासूनच दुकानांसमोर रांगा लावलेल्या होत्या.

सार्वजनिक सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, मेसर्स सोलिनो इंटरनॅशनल प्रा.लि.चे संचालक श्री. मनोज जे. बुधिया हे गावात - सातिवली, तालुका वसई आणि जिल्हा-पालघर येथे स्थित जुना सर्व्हे क्रमांक १६, हिस्सा क्र. १० भाग., जुना सर्व्हे नं. २३, हिस्सा क्र. ३/१ भा., जुना सर्व्हे नं. २५, हिस्सा क्र. १ भा., नवीन सर्व्हे नं. १६, हिस्सा क्रमांक बी/१ धारक 'स्क्वेअर इंडस्ट्रियल पार्क-फेज ।।' या नावाने ओळखल्या जाणार्या या प्रकल्पामधील 'सरिता' म्हणून ओळखल्या जाणार्या 'बिल्डिंग क्रमांक १'' मधील गाला क्रमांक २०४, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, दुसरा मजला, गाला क्रमांक २०५, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, दुसरा मजला, गाला क्रमांक २०६, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, दुसरा मजला, गाला नं.२०७, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, दुसरा मजला, गाला क्र.२०८, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, दुसरा मजला, गाला क्रमांक २०९, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, दुसरा मजला, गाला नं. २१०, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, दुसरा मजला, गाला क्रमांक २११ क्षेत्रफळ ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, दुसरा मजला, गाला क्रमांक ३०४, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, तिसरा मजला, गाला क्रमांक ३०५, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, तिसरा मजला, गाला नं.३०६, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, तिसरा मजला, गाला नं.३०७, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, तिसरा मजला, गाला नं. ३०८, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, तिसरा मजला, गाला क्र. ३०९, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, तिसरा मजला, गाला नं.३१०, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, तिसरा मजला, गाला नं.३११, मोजमापित ८६.१० चौ. मीटर चटई क्षेत्रफळ, तिसरा मजला चे मालक असून, त्यांनी माझे अशील बसीन कॅथोलिक को-ऑप. बँक लि., माणिकपूर शाखा, वसई, पालघर यांच्याकडे वरील मालमत्तेच्या प्रतिभूतीच्या समक्ष कर्जासाठी संपर्क केला आहे.

कोणत्याही व्यक्तीला उपरोक्त गाळे किंवा त्याच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, तारण, प्रभार, उपहार, न्यास, वारसाहक्क, ताबा, पट्टा, पोट-भाडोत्री, अभिहस्तांकन, हस्तांतरण, भोगवटा, उप-भोगवटा, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकारी, अनुज्ञप्ती, परिरक्षण, प्रलंबित दावा, कर्ज, आगाऊ, धारणाधिकार, तारण, आदेश, कोणत्याही न्यायालयाद्वारे पारित निकाल किंवा हुकूम नामा, कर किंवा महसूल किंवा वैधानिक प्राधिकरण, जप्ती, समझोता आणि/ किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे दावा असल्यास, याद्वारे आजच्या तारखेपासून १४ दिवसाच्या कालावधीमध्ये बी/१०६, १ ला मजला, सव्वीद मंझिल सीएचएस लि., पंडीत दिनदयाल नगर, बसिन कॅथॉलीक बँक लि. च्या समोर, माणिकपूर, वसई (प), जिल्हा पालघर - ४०१२०२ येथे निम्नस्वाक्षरीकारांना वैध दस्तावेज पुराव्यासोबत कळविण्यासाठी किंवा असे दावे सादर करण्यासाठी अधिसूचीत करण्यात येत आहे, अन्यथा त्याबाबत कोणतेही दावे अस्तित्वात नाही आणि असल्यास, ते सोडून दिले किंवा परित्याग केले असे मानण्यात येईल आणि माझे अशील सदर गाळे खरेदीच्या व्यवहाराची प्रक्रिया करतील.

वसई, दिनांकित २९ मे, २०२४

सही/-
डेव्हीड एस. दाबरे
ॲडव्होकेट हाय कोर्ट, बॉम्बे

फॉर्म क्र. युआरसी - २

कायद्याच्या अध्याय XXI च्या भाग I अंतर्गत नोंदणी विषयक सूचना देणारी जाहिरात
(कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद ३७४ (बी) आणि कंपनी (नोंदणीसाठी प्राधिकृती) अधिनियम, २०१४ च्या नियम ४ (१) च्या अनुरोधाने)

१. याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद ३६६ च्या उप - अनुच्छेद (२) च्या अनुरोधाने, कंपनी निबंधक, मुंबई, महाराष्ट्र यांच्याकडे अर्ज करण्यात आला आहे की, **बिआँडबॅरियर प्रोडक्ट्स एलएलपी** ही कंपनी कायदा, २०१३ च्या अध्याय XXI च्या भाग I अंतर्गत शेअर्सद्वारे कंपनी लिमिटेड म्हणून नोंदणी केली जाऊ शकेल.
२. कंपनीची प्रमुख उद्दीष्ट खालीलप्रमाणे आहेत :-
व्यापार, आयात, निर्यातीचा व्यवसाय करणे आणि अन्यथा हेल्थकेअर आणि लाईफस्टाईलसाठी दिव्यांगजनांसाठी इक्युपमेंट, इन्स्ट्रूमेंटस आणि अप्लायन्सेसमध्ये कार्यरत.
३. प्रस्तावित कंपनीच्या संक्षेपलेखन आणि संस्थापन नियमावलीच्या मसुद्याची प्रत बी/७०२, निलयोग वेदांता, घाटकोपर - अंधेरी लिंक रोड, घाटकोपर - पश्चिम, मुंबई - ४०००८६ येथील कार्यालयामध्ये पाहू शकता.
४. याद्वारे सूचना देण्यात येते की, कोणतीही व्यक्ती सदर अर्जाला आक्षेप घेत असल्यास त्यांचा आक्षेप निबंधकांना, आयआयसीए बिल्डींग, प्लॉट क्र. ६, ७, ८, सेक्टर - ५, मानेसर, गुरूग्राम, हरियाणा येथे सदर सूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून एकवीस दिवसात, कंपनीच्या बी/७०२, निलयोग वेदांता, घाटकोपर - अंधेरी लिंक रोड, घाटकोपर - पश्चिम, मुंबई - ४०००८६ येथील नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रतीसह लेखी स्वरूपात कळवावे.

दिनांक २७ मे २०२४.
अर्जदारांचे नाव १. **मिरा आदित्य वोरा**
२. **कानन कल्पेश दोषी**

अर्ज क्र. आयएनसी-२६
(कंपन्यांचे (स्थापना) नियमन, २०१४ च्या विनियमन ३० अन्वये)

कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय एका राज्यातून दुसऱ्या राज्यात बदलण्याकरिता वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाची जाहिरात

केंद्र सरकार,
विभागीय संचालक, पश्चिम विभाग, मुंबई यांच्या समक्ष
कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३ च्या उपकलम ४ आणि
कंपन्यांचे (स्थापना) नियमन, २०१४ च्या नियमन ३० च्या उप नियम(५)च्या खंड(अ)च्या प्रकरणात आणि

हायड्रा ॲन्टिव्ह फार्मा सायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड,
नोंदणीकृत कार्यालय - पहिला मजला, फाईन मेंशन, २०३ डी. एन. मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०००७१ यांच्या प्रकरणात

... अर्जदार

सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, वरील उल्लेखित याचिकादार कंपनी त्यांचे नोंदणीकृत कार्यालय कंपनी निबंधक, मुंबई यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत "महाराष्ट्र राज्य" येथून कंपनी निबंधक, बेंगळुरू यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत "कर्नाटक राज्य" येथे बदलण्यास कंपनीस सक्षम करण्याकरिता दि. २७ मे, २०२४ रोजी घेण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये सदस्यांद्वारे मंजूर करण्यात आलेल्या विशेष ठरावानुसार कंपनीच्या मेमोरँण्डम ऑफ असोसिएशनमधील बदलास मंजुरी मिळविण्याकरिता, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३ अन्वये केंद्र सरकार (विभागीय संचालक यांना अधिकार) कडे अर्ज करण्याचे अर्जदार कंपनी प्रस्तावित आहे.

कोणी व्यक्ती, ज्यांचे हितसंबंध कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रस्तावित बदलामुळे बाधित होत असल्यास त्यांनी **एकतर एमसीए-२१ पोर्टल (www.mca.gov.in)** येथे गुंतवणूकदार तक्रार अर्ज भरून किंवा त्याचे/तिचे आक्षेप, त्याच्या/तिच्या हितसंबंधाचे स्वरुप आणि विरोधाचा आधार नमूद केलेले प्रतिज्ञापत्र विभागीय संचालक यांचे कार्यालय, एव्हरेस्ट, ५ वा मजला, १०० मरिन ड्राईव्ह, मुंबई-४००००२ येथे सदर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत स्वत: किंवा कोणाही तर्फे पोहोचवावे किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे व त्याची प्रत अर्जदार/याचिकादार कंपनीस त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयास निम्न उल्लेखित पत्त्यावर पाठवावी:

नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता: पहिला मजला, फाईन मेंशन, २०३ डी. एन. मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१

हायड्रा ॲन्टिव्ह फार्मा सायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड करिता
(चंद्राप्पा सीतारामय्या)
डीआयएन: ०७४०५७७३
संचालक
दिनांक: २७ मे, २०२४
ठिकाण: मुंबई

ई-लिलाव विक्री सूचना
ट्रम्प इम्पेक्स प्रा. लि. - परिसमापनामध्ये
(एनसीएलटी मुंबई आदेश दिनांकित २१ मार्च, २०२३ अन्वये कंपनीच्या परिसमापनाचा आदेश देण्यात आला होता) CIN : U25199MH2006PTC161869 (स्थापना १८ मे, २००६)
नोंदणीकृत पत्ता : ३०१, ३रा मजला, सेलो प्लाझा, व्ही. पी. रोड, विलेपार्ले (प.), मुंबई - ४०००५६, महाराष्ट्र.

ई-लिलाव

आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या, विनियमन ३२ (ई) आणि ३२ ए अंतर्गत चालू स्थितीनुसार आणि विनियमन ३७ ए अंतर्गत ''तत्परतेने वसुलीयोग्य नसलेल्या मालमत्तेच्या'' अभिहस्तांकनासाठी कंपनी (**ट्रम्प इम्पेक्स प्रा. लि.**) च्या संपादनासाठी बोलीदारांकडून स्वास्यस्याची अभिव्यक्ती (ईओआय) आमंत्रित करण्यात येत आहे. नमूद अनुसार मालमत्ता - पार्सल करता कोणत्याही प्रकारच्या हमी आणि क्षतिपूर्ती विना, खालील तक्त्यामध्ये दिलेल्या वेळापत्रकानुसार, ऑनलाईन ई-लिलाव सेवा प्रदात्यांच्या **https://ncltauction.auctiontiger.net** मार्फत ई-लिलाव मंचाद्वारे आयोजित करण्यात येईल.

ईओआयसह बोली दस्तावेज, प्रपत्र, ॲफीडेव्हीट्स, उद्घोषणा इत्यादी सादर करण्याची अंतिम तारीख	११ जून, २०२४ (सायं. ५ वा. पर्यंत भाप्रवे)
लिलाव अंतर्गत मालमत्तेच्या निरीक्षण किंवा योग्य साक्षेपासाठी अंतिम तारीख	१८ जून, २०२४ (सायं. ५ वा. पर्यंत भाप्रवे)
इरठे सादर करण्याची अंतिम तारीख	१९ जून, २०२४ (सायं. ५ वा. पर्यंत भाप्रवे)
ई-लिलावाची तारीख आणि वेळ	२१ जून, २०२४ (स. ११ ते दु. १ वा. भाप्रवे)

अ.क्र.	मालमत्तेचा तपशील	राखिव किंमत	इरठे	बोली वाढविण्याची रक्कम
	विकल्प ए : चालू असलेली न्यायालयीन प्रकरण आणि एनआरआरए समाविष्ट आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१६ च्या विनियमन ३२ (ई), ३२ ए आणि ३७ अनुसार चालू स्थितमध्ये कॉर्पोरेट ऋणकोची विक्री. लिलावाची तारीख व वेळ : २१ जून, २०२४ रोजी स. ११ ते दु. १ वा.			
१	चालू असलेली न्यायालयीन प्रकरण आणि एनआरआरए, समाविष्ट आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियम, २०१६ च्या विनियम ३२ (ई), ३२ ए आणि चालू स्थितीमध्ये कॉर्पोरेट ऋणकोची विक्री.	रु.१०,००,०००/-	रु.१,००,०००/-	बोली वाढविण्याची रक्कम रु. ५०,०००/- प्रती बोली असेल
	विकल्प बी : आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३७ अनुसार 'तत्परतेने वसुलीयोग्य नसलेल्या मालमत्तेचे अभिहस्तांकन. लिलावाची तारीख व वेळ : २१ जून, २०२४ रोजी स. ११ ते दु. १ वा.			
१.	तत्परतेने वसुलीयोग्य नसलेल्या मालमत्तेचे अभिहस्तांकन, अर्थात एनसीएलटी मुंबई खंडपीठाच्या समक्ष आयबीसी, २०१६ च्या सेक्शन ६० (५), ४३, ४५ आणि ६६ अंतर्गत अर्ज प्रलंबित	आयबीबीआय परिसमापन प्रक्रिया विनियमन, २०१६ च्या विनियमन ३७ ए अंतर्गत तत्परतेने वसुली योग्य नसलेल्या मालमत्तेच्या अभिहस्तांकनासाठी बोलीदारांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.		

टिप : प्रक्रियेवरील अधिक स्पष्टीकरणासाठी, कृपया ईमेल आयडी : tipl.liquidation@gmail.com वर आम्हाला मेल करा.

दिनांक : २९/०५/२०२४ **अतुल टी. मेहता**
स्थळ : मुंबई आ

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that **SHRI. GORDHAN KHEMCHAND THAWANI** is entitled to and owner of 25% undivided rights, titles, interests and shares in all the piece and parcel of land or ground bearing Plot No. 612 and common areas and spaces in the building standing thereon known as "VENUS HOUSE" situate at 15th Road, Khar (West), Mumbai-400052 (defined firstly in the Schedule hereunder) together with a Residential Premises being Flat on the First floor (Rear Side) alongwith Garage on right rear side in the building (defined secondly in the Schedule hereunder).

The said Shri Gordhan Khemchand Thawani intends and haveagreed to sell, convey, transfer and assign on ownership basis all the right, title and interest in the said property mentioned hereunder to my clients.

If all/any persons/financial institutions/banks/Organizations/society etc. having any right, title, Interest, benefit, claim or demand against into or upon the Property(detailed hereunder) or any parts thereof and/ or the title deeds in respect thereof, by way of sale, transfer, assignment, Agreement for Sale, allotment, exchange, gift, pledge, lis-pendens, lease, sub-lease, tenancy, sub-tenancy, license, possession, use, occupation, caretaker rights, mortgage, charge, lien, trust, inheritance, bequest, succession, partition, family arrangement/ settlement, will, testamentary instrument, probate, letters of administration with or without will annexed thereto, easement, maintenance, decree and/or order of any court or otherwise or rights of whatsoever nature, are hereby required to inform in writing, together with certified true copies of such a written documentary proofs in support thereof to the undersigned at the address mentioned herein below within 15 days from the date of publication hereof, failing which all such claims (if any) shall be deemed to have been waived, anal or abandoned and in that case my clients will complete the transaction mentioned above. Later on, claims of whatsoever nature will not be entertained, which kindly please note.

The Schedule of Property :

FIRSTLY **:**

25% undivided rights, titles, interests and shares in all the piece and parcel of land or ground bearing Plot No. 612 admeasuring 673.10 square meters (as per Property card) and bearing CTS no. F/75 of Village Bandra, Taluka Andheri alongwith undivided rights and interest in common areas and spaces in the building standing thereon known as "VENUS HOUSE" comprising of Ground plus 1 (one) Upper Floor standing lying and being on 15th Road, Khar (West), Mumbai-400052 in the Registration District and Sub-District of Mumbai Suburban.

SECONDLY **:**

Flat admeasuring 1150 square feet carpet area on the First Floor (Rear Side) alongwith Garage on right rear side in the building known as "Venus House" standing lying and being on Plot of land more particularly described in firstly in the Schedule hereinabove.

Dated this 29th day of May, 2024

Sd/-
(Kunal S. Jain)
Advocate, High Court
Plot No. 569, Nina Vihar C.H.S.L.,
Unit No. 5, 1st Floor, 5th Road,
Khar (West), Mumbai-400052
M : 9892990294
kunaljain2008@gmail.com

PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the general public at large that my client/s is/ are negotiating to purchase from Mr. Hardik Bharat Patel, the flat being Flat No.901 Duplex, totally admeasuring 4368 Sq.ft., RERA Carpet area on the 9th & 10th floors, in the building known as "4.56 JVPD" being situated at Plot No.13, Suvarna Nagar Co-operative Housing Society Limited, N.S. Road No.4, JVPD, Vile Parle West, Mumbai 400056, along with Five Car Parking Spaces.

Any/ All person/s and/ or Financial Institution/s having, claiming any right, title, benefit and/ or interest whatsoever in respect of the below mentioned flats, by way of sale, exchange, mortgage, charge, gift, trust, possession, inheritance, transmission, lien, easement, bequest or otherwise howsoever, is/ are hereby required to make the same known in writing, along with notarized true copies of all registered documents in support of the claim to and at the Office of the **Advocate, Mr. Dipesh J. Sanchala,** Office No.112-A, 1st floor, Supermarket CHSL, Monghibai Road, Vile Parle East, Mumbai 400057, within a period of 14 days from the date of publication hereof, failing which all such claims, rights, title, benefits and/ or interest if any, shall be considered to have been waived and/ or abandoned without any further notice.

SCHEDULE OF THE PROPERTY

ALL THAT Flat No.901 Duplex, totally admeasuring 4368 Sq.ft., RERA Carpet area on the 9th & 10th floors, in the building known as "4.56 JVPD" being situated at Plot No.13, Suvarna Nagar Co-operative Housing Society Limited, N.S. Road No.4, JVPD, Vile Parle West, Mumbai 400056, along with Three Car Parking Spaces, and the said building constructed on plot of land being lying and situated at Village Vile Parle West, Taluka Andheri, bearing CTS No.46, or thereabouts in the Registration District and Sub District of Mumbai Suburban District.

Dated: 29/05/2024
Sd/-
(DIPESH J. SANCHALA)
Advocate

RAJ OIL MILLS LIMITED

CIN-L15142MH2001PLC133714 | Registered Office Address.: 224-230 Bellasis Road Mumbai - 400008
Corporate Office Address: 205, Raheja Centre, Free Press Journal Marg, 214, Nariman point, Mumbai – 400021.
Email Id- contact@rajoilmillsltd.com | Phone: 022 -66666988/989 / 022-66666988/89 | Website: www.rajoilmillsltd.com

EXTRACT OF STANDALONE AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED MARCH 31, 2024 (Rs. in Lakhs except EPS)

Sr. No.	Particulars	Quarter Ended			Year Ended	
		31/03/2024	31/12/2023	31/03/2023	31/03/2024	31/03/2023
		Audited	Un-Audited	Audited	Audited	Audited
1	Total Income From Operations	3119.23	3574.00	3920.09	12752.10	14133.98
2	Net Profit/(Loss) for the period (before tax, Exceptional and /or Extraordinary Items)	12.60	109.07	65.42	175.16	308.00
3	Net Profit/(Loss) for the period before tax (after Exceptional and /or Extraordinary Items)	12.30	109.07	17.69	175.16	260.27
4	Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items)	10.30	106.98	6.28	170.77	242.51
5	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	16.44	106.98	4.46	176.91	240.66
6	Equity Share Capital	1498.87	1498.87	1498.87	1498.87	1498.87
